| | |
|---|---|
| | **भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ३३५/२०१३ मधील निशाणी क्रमांक १८ खालील आदेश** (**CNR No. MHWS**050001882012) |

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी, पोलीस पाटील यांनी दिलेला वारसाचा दाखला, दुधराम कनिराम पवार व त्यांची पत्नी पंचफुला दुधराम पवार यांच्या दोन मृत्यूप्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती आणि चार आधारकार्डांच्या छायांकीत प्रती, दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास गैरअर्जदार क्र.२ यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार दाखल करु इच्छित असलेले पोलीस पाटील यांनी दिलेला वारसाचा दाखला, दुधराम कनिराम पवार व त्यांची पत्नी पंचफुला दुधराम पवार यांच्या दोन मृत्यूप्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती आणि चार आधारकार्डांच्या छायांकीत प्रती, अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | .. अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. ०१ बाबत** :–

३. अर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, या अर्जात मयत अर्जदार यांच्या वारसांनी मुदत अधिनियम नुसार दिलेला अर्ज निशाणी क्र. १५ आणि मयताचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दिलेला अर्ज निशाणी क्र. १६ हे दोन अर्ज न्यायप्रविष्ट आहेत. त्यामुळे अर्जदार हे पोलीस पाटील यांनी दिलेला वारसाचा दाखला, दुधराम कनिराम पवार व त्यांची पत्नी पंचफुला दुधराम पवार यांच्या दोन मृत्यूप्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती आणि चार आधारकार्डांच्या छायांकीत प्रती, दाखल

करु इच्छीत आहेत. तरी, त्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट गैरअर्जदार क्र. २ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, संबंधीत कागदपत्रे दाखल करण्यास गैरअर्जदार क्र. २ चा विरोध आहे तरी, अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, या अर्जात मयत अर्जदार यांच्या वारसांनी मुदत अधिनियम, नुसार दिलेला अर्ज निशाणी क्र. १५ आणि मयताचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दिलेला अर्ज निशाणी क्र. १६ हे दोन अर्ज न्यायप्रविष्ट आहेत. अर्जदार यांनी पोलीस पाटील यांनी दिलेला वारसाचा  दाखला, दुधराम कनिराम पवार व त्यांची पत्नी पंचफुला दुधराम पवार यांच्या दोन मृत्यूप्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती आणि चार आधारकार्डांच्या छायांकीत प्रती, ही कागदपत्रे दाखल केली तर उपरोक्त अर्ज निशाणी क्र. १५ व १६ हे गुणदोषावर निकाली काढण्यास ती कागदपत्रे उपयुक्त ठरु शकतात त्यामुळे ती कागदपत्रे अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि अर्जदार यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.१८ हा मंजुर करण्यात येत आहे आणि अर्जदार यांना संबंधीत दस्तऐवज दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
HAMBIRE
DHANANJAY
BHAGWANRAO
Date: 2025.09.02
12:31:59 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : २.९.२०२५.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

<u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per original Order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- C.R.Gadge |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :-2/9/2025 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 2/9/2025 |
| 5) | Order uploaded on | :- 2/9/2025 |